पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## १. नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नाव</td><td>नागरी भागातील दलित वस्त्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना</td></tr>
<tr><td>२</td><td>योजना केव्हा पासून सुरु आहे.</td><td>सन २००४-२००५</td></tr>
<tr><td>३</td><td>योजना /कार्यक्रमाचे उद्दिष्ट</td><td>शहरी भागात राहणाऱ्या मागासवर्गीय नागरीकांनाही पायाभूत व मूलभूत सुविधा प्राधान्याने देण्यासाठी अनेक विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. परंतु शासनाद्वारे आतापर्यत राबविलेल्या नागरी पाणी पुरवठा विषयक धोरणामध्ये नागरी भागातील दलित वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत विशेष योजना आतापर्यत राबविण्यात आलेल्या आहेत. नागरी भागातील लोकसंख्या  वाढ व वाढत्या नागरीकरणामुळे दलित वस्त्यामध्ये अस्तीत्वातील पिण्याच्या पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये विशेष प्राधान्य देवून वाढवृध्दी करणे आवश्यक असल्याने  नागरीक्षेत्रातील दलित वस्त्यामध्ये अथवा दलित लोकसंख्या मोठया प्रमाणावर असणाऱ्या नागरी भागातील वाडीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षा पासून सदर योजना राबविण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>४</td><td>निधी उपलब्धता /स्त्रोत</td><td>
<table>
<tr><td colspan="3">नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द यांची लोकसंख्या किमान १५० आहे तिथे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत  राबविण्यात येते.  (बृहन्मुंबई वगळून)</td></tr>
<tr><td></td><td>नागरी स्थानिक स्वराज्य संस्था</td><td>कमाल अनुज्ञेय अनुदान</td></tr>
<tr><td>१</td><td>महानगरपालिका</td><td>३२.००</td></tr>
<tr><td>२</td><td>अ वर्ग नगरपरिषद</td><td>१५.००</td></tr>
<tr><td>३</td><td>ब वर्ग नगरपरिषद</td><td>१२.००</td></tr>
<tr><td>४</td><td>क वर्ग नगरपरिषद</td><td>१०.००</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>५</td><td>योजनेचे /कार्यक्रमाचे ठळक वैशिष्टय</td><td>१. शासन निर्णय, क्रमांक नादपि / २००४/ प्र.क्र.२८/ पापु-२२, दिनांक २५ ऑगस्ट, २००६ अन्वये, ही योजना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसुचित जातीसाठी आरक्षित  प्रभागामध्ये राबविण्यात येते.<br><br>२. जर या आरक्षित प्रभागामध्ये पाणी पुरवठयाची पर्याप्त सुविधा अस्तित्वात असेल तर शहरातील अन्य प्रभागापैकी ज्या प्रभागामध्ये अनुसुचित जाती व नवबौध्द यांची लोकसंख्या किमान १५० आहे तिथे राबविण्यात येते.<br><br>३. प्राधान्य देताना जिथे जास्त अनुसुचित जातीची लोकसंख्या आहे त्या प्रभागाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे व त्यानंतर उतरत्या क्रमाने प्रभाग निवडावा.<br><br>४. जेथे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या श्रेणीनुसार शासनाच्य दरडोई  पाणी पुरवठयाच्य निकषापेक्षा  कमी किंवा अनियमित पाणी पुरवठा होतो अशा दलित वस्तीमध्ये ही योजना</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | राबविण्यात येते.<br><br>या योजने अंतर्गत नागरी क्षेत्रातील दलित वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी खालील कामे घेण्यात येतात.<br><br>१. दलित वस्तीकरीता पाण्याचे स्त्रोत किंवा अस्तित्वातील स्त्रोताचे बळकटीकरण करणे ( पाऊसपाणी संकलनाचा यात समावेश राहील )<br>२. दलित वस्तीकरीता स्त्रोतावरुन पाणी आणण्यासाठी आवश्यक यंत्र सामुग्री ( मोटार पंप इत्यादी )<br>३. दलित वस्तीसाठी स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची टाकी (ESR ) / साठवण टाकी<br>४. दलित वस्तीतील दलितासाठी वितरण व्यवस्था<br>५. तांत्रिक सुधारणा करुन जर अस्तित्वातील योजनेतून दलित कुटुंबाना योग्य पाणी मिळेल अशा सुधारणा.<br>६. याव्यतिरिक्त दलित कुटुंबांना पाणी मिळण्याच्या दृष्टीने दलित वस्ती पाणी पुरवठा प्रकल्प अंमलबजावणी समितीने सूचविलेली आवश्यक कामे घेणे.<br><br>नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांतर्गत घ्यावयाच्या कामांकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ९० टक्के अनुदान आणि १० टक्के लोकवर्गणी असा वित्तीय आकृतीबंध विहीत करण्यात आला असून नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांतर्गत अनुदानाची रक्कम ही विशेष घटक योजने अंतर्गत आहे. |
| ६ | योजना/कार्यक्रमाचे भौतिक/ आर्थिक साध्य | सदर योजनेमार्फत ३० महानगरपालिका व २४४ नगरपालिका पैकी महानगरपालिकेमधील ५७ कामांसाठी व नगरपालिकेमधील ४८८ कामांसाठी अशा एकूण ५५६ कामांकरीता सन २००४-२००५ ते २०१७-२०१८ पर्यत रु.९४५९.५४ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले असून सदर कामे पूर्ण झाली आहेत त्यामुळे तेथील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता झाली आहे. |

## २. केंद्र पुरस्कृत कमी खर्चाची स्वच्छता कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | केंद्र पुरस्कृत कमी खर्चाची स्वच्छता कार्यक्रम |
| २. | योजना केव्हा पासून सुरु आहे. | सन २००८ पासून |
| ३ | योजना/कार्यक्रमाचे उद्दिष्ट | केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक तत्वांनुसार राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांकरिता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राज्यातील सर्व शहरांमध्ये राबविणे. |
| ४ | निधी उपलब्धता/स्त्रोत | केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रती शौचालय बांधकामाचा खर्च रु. १०,०००/- याप्रमाणे प्रती कुटुंब वित्तीय सहाय्याचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे:-<br>केंद्र शासनाचे अनुदान ७५% - रु. ७,५००/-<br>राज्य शासनाचा हिस्सा १५% - रु. १,५००/-<br>लाभार्थी हिस्सा १०% - रु. १,०००/- |
| ५ | योजनेचे / कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट | केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी वैयक्तिक शौचालये बांधण्याकरीता प्रति कुटुंब |

| | | |
|---|---|---|
| | | उत्पन्नाची मर्यादा रु. ३,३००/- प्रतिमहा इतकी विहीत करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत दोन खड्डुंयाची (TWO PIT POUR FLUSH) अथवा स्थानिक परिस्थितीस अनुरुप अशा पध्दतीची शौचालये बांधण्यात येतात. |
| ६ | योजना/कार्यक्रमाचे भौतिक/ आर्थिक सहाय | केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने १६ नागरी संस्थांच्या २१ प्रस्तावना अंतिम मान्यता दिली असून ३९,६६३ वैयक्तिक शौचालये बांधण्यात येणार असून त्यापैकी ऑक्टोबर, २०१६ पर्यंत २७,१८४ वैयक्तिक शौचालय बांधण्यात आली असून २,१८९ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर योजना शासन परिपत्रक क्र. केंपुयो-२०१७/प्र.क्र.५३/पापु-२१ दि. २५ सप्टेंबर,२०१७ अन्वये खंडीत करण्यात आलेली आहे. |

३. **मागणी क्रमांक वाय-६, ४२१५ (४२१५ ०१०७) :-** बृहन्मुंबईला पाणी पुरवठा करणा-या भातसई प्रकल्पास भांडवली खर्चासाठी अनुदान. ( ४२१५ ०१०७) या लेखाशिर्षा अंतर्गत अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ,ठाणे यांना भातसई प्रकल्पास भांडवली खर्चासाठी सन २०११-१२ या आर्थिक वर्षापर्यंत अनुदान वितरीत करण्यात येत होते. वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांनी शासनाकडे सादर केलेल्या सहाही सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास शासनाकडून अदयाप मान्यता न मिळाल्याने सन २०१२-१३ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षापर्यंत सदर प्रकल्पास अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही.

४. **मागणी क्रमांक वाय-२,२२१५ (२२१५ ८९७३) :-** महानगरपालिका व नगरपालिका (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (२२१५ ८९७३) (भारीत खर्च) या लेखाशिर्षाखाली न्यायालयाने एखादया प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार एखादया प्रकरणात तातडीने निधी दयावयाचा झाल्यास निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

५. **मागणी क्रमांक वाय-२, २२१५ (२२१५ ९५५९) :-** सेवास्तरीय बेंचमार्क ही योजना १०० % केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजनेअंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून कोणताही नवीन प्रस्ताव शासनास प्राप्त नाही. यास्तव सन २०१५-१६ पासून र.१०००/-(Token Demand) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते. परंतु सन २०१८-१९ पासून सदर योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद केलेली नाही.

७. **मागणी क्रमांक वाय-२, २२१५ (२२१५ २३११) :-** संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान ही योजना राज्याच्या नागरी भागामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सन २००२-२००३ पासून राज्य हागणदारीमुक्त करणे हा संकल्प घेऊन राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये राज्यातील सर्व नागरी संस्थाचा सहभाग निश्चित करुन दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत मार्गदर्शक सुचनानुसार सदर अभियान दिनांक २ ऑक्टोबर ते पुढील वर्षाच्या दि. १४ नोव्हेंबर पर्यंत राबविण्यात येते. उपरोक्त अभियान कालावधीत विहित निकषांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागरी संस्थांचा यथोचित सन्मान

राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात येतो. परंतु मागील काही वर्षापासून अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास नागरी संस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत नसल्याने सर्व नागरी संस्थांच्या प्रशासकीय तसेच नियंत्रक अशा नगर विकास विभागामार्फत संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान हा योजनेत्तर योजना विषय नगर विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेण्यात आली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील सदर विषय नगर विकास विभागाकडे या विषयाच्या सर्व मूळ नस्त्यांसह हस्तांतरीत करण्यापूर्वी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनुसार सुधारीत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक असल्याने नगर विकास विभागास अभिप्राय देण्याची विनंती करण्यात आली असून सदर अभिप्राय या विभागास अदयाप प्राप्त झालेले नाही.